**पंतप्रधानांची नामिबियाच्या राष्ट्राध्यक्षांशी भेट (09 जुलै 2025)**

09 जुलै 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी नामिबियाच्या अधिकृत दौऱ्यादरम्यान आज विंडहोक येथील स्टेट हाऊसमध्ये नामिबियाच्या राष्ट्राध्यक्षा डॉ. नेतुम्बो नंदी-नदैतवाह यांची भेट घेतली. स्टेट हाऊसमध्ये आगमन झाल्यावर, राष्ट्राध्यक्षा नंदी-नदैतवाह यांनी पंतप्रधान मोदी यांचे हार्दिक स्वागत केले आणि त्यानंतर त्यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले. भारताकडून नामिबियाचा हा पंतप्रधानस्तरीय दौरा 27 वर्षांनंतर झाला. या वर्षी मार्चमध्ये पदभार स्वीकारल्यानंतर राष्ट्राध्यक्षा नंदी-नदैतवाह यांनी आयोजित केलेली ही पहिलीच द्विपक्षीय औपचारिक भेट होती.

2. नामिबियाच्या राष्ट्राध्यक्ष पदावर निवड झाल्याबद्दल पंतप्रधानांनी नंदी-नदैतवाह यांचे अभिनंदन केले. दोन्ही नेत्यांनी उभय देशांमधील द्विपक्षीय संबंध दृढ करणाऱ्या अभिमानास्पद इतिहासाचे स्मरण केले. नामिबियाचे संस्थापकीय जनक डॉ. सॅम नुजोमा यांच्या निधनाबद्दल पंतप्रधानांनी शोक व्यक्त केला. संरक्षण, सागरी सुरक्षा, डिजिटल तंत्रज्ञान आणि UPI, कृषी, आरोग्य आणि फार्मा, ऊर्जा आणि महत्त्वपूर्ण खनिजे या क्षेत्रांसह द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यावर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.

3. द्विपक्षीय व्यापारामधील वाढीबद्दल समाधान व्यक्त करून, या क्षेत्रातील पूर्ण क्षमतांचा वापर अद्याप झाला नसल्याचे उभय नेत्यांनी नमूद केले. यासंदर्भात त्यांनी भारत-SACU PTA वरील चर्चेला गती देण्याची गरज व्यक्त केली. पंतप्रधानांनी नमूद केले की भारत नामिबियामधील तज्ज्ञांसाठी क्षमता निर्माण कार्यक्रम आयोजित करून विकास सहकार्याच्या प्रयत्नांना गती देईल आणि नामिबियामध्ये उत्पादन सुविधा स्थापन करण्यासाठी भागीदारीच्या शक्यतांचा शोध घेईल. कृषी, माहिती तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, आरोग्यसेवा, शिक्षण, महिला सशक्तीकरण आणि बालकल्याण या क्षेत्रांमध्ये जलद प्रभाव विकास प्रकल्पांसाठी भारताचे सहकार्य राहील असे आश्वासन पंतप्रधानांनी दिले. पंतप्रधानांनी शेतीसाठी ड्रोन वापरण्याचा भारताचा अनुभव सांगितला. हा प्रकल्प नामिबियासाठी मोलाचा ठरू शकतो.

4. भारतातील चित्ता संवर्धन प्रकल्पाला नामिबियाने पाठिंबा दिल्याबद्दल पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्षा नंदी-नदैतवाह यांचे आभार मानले. त्यांनी नामिबियाला आंतरराष्ट्रीय बिग कॅट अलायन्समध्ये सहभागी होण्यासाठी देखील आमंत्रित केले.

5. उभय नेत्यांनी परस्पर हिताच्या जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर नामिबियाने भारतीय जनतेला दिलेला भक्कम पाठिंबा आणि ऐक्यभाव याबद्दल पंतप्रधानांनी त्यांचे आभार मानले. दहशतवादाविरोधातील जागतिक लढा अधिक बळकट करण्यावर

उभय नेत्यांनी सहमती दर्शविली. त्यांनी ग्लोबल साऊथचा आवाज बुलंद करण्यासाठी एकत्र काम करण्याची वचनबद्धता देखील दर्शविली.

6. या चर्चेनंतर उभय नेत्यांनी आरोग्य आणि उद्योजकता या क्षेत्रांमधील सामंजस्य करारांची देवाणघेवाण केली. याव्यतिरिक्त, नामिबिया आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधा आणि जागतिक जैवइंधन गटात सहभागी झाल्याचे, तसेच UPI तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी परवाना करार करणारा पहिला देश असल्याचे घोषित करण्यात आले.

7. राष्ट्राध्यक्षा नंदी-नदैतवाह यांनी पंतप्रधानांच्या सन्मानार्थ मेजवानी आयोजित केली होती. पंतप्रधानांनी त्यांना परस्पर सोयीस्कर वेळी भारत भेटीचे आमंत्रण दिले.

**विंडहोक**

**09 जुलै 2025**